अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । रविवार, दि. ८ सप्टेंबर २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : ३४० वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८




## मोहोळच्या पोलिसाला मारहाण; गुन्हा दाखल

**मोहोळ** : पत्नीने पोलिसांच्या ११२नंबर वर कॉल केला. त्यावेळी मदतीस आलेल्या पोलिसाला महिलेच्या पतीने मारहाण केली. ही घटना येवती (ता .मोहोळ ) येथे गुरुवारी सायंकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात मोहोळच्या पोलिसांनी सागर भारत गाडे (वय ३४ रा.येवती) याच्या विरुद्ध मारहाण आणि शासकीय कामात अडथळा केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. सागर गाडे हा घरी त्रास देत असल्याने त्यांची पत्नी ११२ नंबर वर कॉल केली. त्यावेळी पोलीस शिपाई संदीप विलास सावंत (नेमणूक मोहोळ) हे घटनास्थळी घेऊन आरोपीला समजावून सांगत होते. त्यावेळी त्याने पोलिसाला शिवीगाळ करून मारहाण करीत शासकीय कामात अडथळा केला. पुढील तपास हवालदार पठाडे करीत आहेत.



# आरक्षणाची धुळवड

## प्रामाणिक रहा, पेढे भरवू पण खंडोजी खोपडे व्हाल तर याद राखा

### जरागेंना आ.राऊत यांचा खणखणीत इशारा


शुक्रवार

**बार्शी/प्रतिनिधी**

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्यास महाविकास आघाडीतील तीन प्रमुख पक्ष तयार असल्याबाबत मनोज जरांगे यांनी त्यांच्याकडून लिहून घ्यावे. महायुतीतील नेत्यांकडून लिहून घेण्याची जबाबदारी माझी राहील. अन्यथा आपण राजकारणातून संन्यास घेवू, अशी प्रतिज्ञा आमदार राजेंद्र राऊत यांनी केली. जरांगे यांनी लोकसभेला महाविकास आघाडीला झुकते माप दिले. आताही सरकार व भाजपाच्या विरोधात बोलून पाडण्याची भाषा करत आहेत. महायुती सरकारने कुणबी नोंदी शोधण्यासह समाजाला स्वतंत्र १० टक्के आरक्षण दिले. तरीही जरांगे सर्वांना शिव्या देत आहेत. त्यांना अहंकार चढला असून मुख्यमंत्रीपदाचे स्वप्न पडत आहे. तुम्ही प्रामाणिक भूमिका घ्याल तर तुमचे फुले अंथरून स्वागत करू, पेढे भरवू पण जर खंडोजी खोपडेच्या भूमिकेत याल तर याद राखा असा खणखणीत इशारा त्यांनी दिला.

मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांनी गेवराई व माजलगांव येथे बार्शीचे आमदार राजेंद्र राऊत यांच्यावर टीका केली.त्यानंतर त्यांच्या टीकेवर स्पष्टीकरण देण्यासाठी राऊत यांनी शुक्रवारी पत्रकार परिषद घेतली. त्यावेळी ते बोलत होते. जरांगे यांच्या भूमिकेवर आ.राऊत यांनी कडाडून टीका केली. त्यांनी सांगितले की, जरांगे यांचे उपोषण सुरू असताना त्यांच्यात व सरकारमध्ये समन्वय साधण्याचे काम केले. त्यांच्याविषयी आदराची भावना व्यक्त करत एसआयटीबाबत सरकारला एक पाऊल मागे घेण्याची विनंती केली. न्यायालयीन लढा लढायचा असेल तर त्यासाठी चांगले वकील द्या, कितीही पैसे लागू दया. ते मराठा समाजातील नेतेमंडळींकडून देण्याची आपण तयारी दर्शविली होती. परंतु त्याबाबतीतही त्यांनी वेगळेच उत्तर दिले.

त्यांच्या भूमिकेबाबत संशय व्यक्त करत आ. राऊत म्हणाले, आमच्या स्थानिक विरोधकांचे ऐकून ते आपल्यावर टीका करत आहेत. राज्यातील ज्या घराण्यांनी मराठा समाजासाठी योगदान दिले आहे त्यांना व माझ्यासह सर्वच मराठा नेत्यांना ते शिव्या देत आहेत. अपमानास्पद बोलत आहेत. माझ्या कुटुंबियांचा काही संबंध नसतानाही ते त्यांच्यावर बोलत आहेत. हाच तुमचा सुसंस्कृतपणा आहे का?

#### लाठ्या-काठ्या खाल्यात

मराठा महासंघाच्या माध्यमातून आपण समाजासाठी आंदोलने केली, लाठ्या, काठ्या सोसल्या आहेत. त्यानंतर राजकारणात आल्यानंतरही छत्रपतींचा आदर्श डोळयासमोर ठेवून मराठा समाजासह सर्व जाती-धर्मातील नागरिकांना सोबत घेवून आपण राजकारण करत आहोत. सर्वच समाजाच्या विकासासाठी आपण नेहमीच योगदान दिले आहे व देत आहे. पूर्वी एसईबीसी आरक्षण मिळाले, त्यावेळीही आपण शिबीरे आयोजित करून हजारो मराठा समाजबांधवांना मोफत प्रमाणपत्रे काढून दिली. आताही कुणबी नोंदी शोधण्यासाठी सहकार्य केले. एसईबीसी प्रमाणपत्रे मिळवून देण्याचे काम करत आहे. मराठा समाजासाठी दिलेले योगदान बार्शीसह तालुक्यातील युवकांना माहीत आहे,असेही आ.राऊत म्हणाले.

#### ...तर त्यादिवशी पांडे चौकात फाशी घेईन

आपण ज्यावेळी त्यांना भेटायला गेलो होतो. त्यावेळी खा.राजेंविषयी त्यांनी अनुद्गार काढल्याचे शपथपूर्वक आ.राऊत यांनी सांगितले. आण्णासाहेब पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी बलिदान दिले त्यावेळी सत्तेवर कोण होते? आरक्षणाबाबतच्या सन १९९४ सालच्या राज्याच्या शासन निर्णयाने समाजाचे किती नुकसान झाले याबाबत जरांगे बोलायला तयार नाहीत. आपणास पदाची लालसा नाही. ज्या दिवशी मी मराठ्यांबरोबर गद्दारी करीन, त्यादिवशी पांडे चौकात फाशी घेईन, अशा शब्दात आ.राऊतांनी जरांगे यांना दिले. बार्शीतील आण्णा शिंदे यांनी त्यांच्या आंदोलनाच्या अनुषंगाने कांही प्रश्न विचारले. ते रास्त असून त्याची उत्तरे त्यांनी दिली पाहिजेत.

## फडणवीस-आ.राऊत दोघे मिळून मराठा समाजात फूट पाडत आहेत

### मनोज जरांगे-पाटील यांचा आरोप


शनिवार

**जालना/प्रतिनिधी**

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आरक्षणासाठी रणशिंग फुंकले असून त्यासाठी राज्यभर घोंगडी बैठकांची मोहीम आखली आहे. शनिवारी बीड जिल्ह्यातील धारूरला जाण्यापूर्वी त्यांनी आंतरवाली सराटी येथे बोलताना बार्शीचे आमदार राजाभाऊ राऊत यांच्यावर ते जाम भडकले. राऊतांनी दिलेले चॅलेंज स्वीकारत जरांगे यांनी राऊतांच्या आरोपांना प्रतिउत्तर देत त्यांना टोलेही लगावले. मी राजगादीला किती मानतो हे उदयनराजे महाराजांना, कल्पना राजे मासाहेबांना आणि छत्रपती संभाजीराजेंना माहिती आहे. राऊतांमध्ये फितुरीचे संस्कार आहेत. राऊतांचा बोलवता धनी देवेंद्र फडणवीस हेच आहेत.हे दोघे मिळून मराठा समाजात फूट पाडत आहेत,अशा शब्दात जरांगे यांनी दोघांवर टीका केली.

राऊत कशाचाही शपथ घेतो, माझ्याजवळच त्यांनी पाच-पन्नास शपथ घेतल्या असतील. तुला देवेंद्र फडणवीसांचे सरकार निवडून यावे असे वाटतं तर आरक्षण का देत नाही? आम्हाला प्रश्न विचारणारा तू कोण? तुला वेळ आल्यावर कळेल. फडणवीसांचे ऐकून तू किती चिखलात फसला. बार्शीत मराठ्यांचे घर तिथे घोंगडी बैठक होणार आहे. राऊत आपला असून त्याच्यामध्ये फितुरीचे संस्कार आहेत. त्याच्यापेक्षा सोपल बरा म्हणावे लागेल. मराठ्यांच्या विचारांचे ओबीसी आहेत, ते चांगले आहेत. राऊत मराठ्यांचे तुकडे करायला निघालाय,असा हल्ला जरांगेंनी राऊतांवर चढवला.

#### जा, मी लय बघितले लुंगे सुंगे

जरांगे यांनी एकेरीवरच राऊतांवर घाव घातले. जा मी लय बघितले लुंगे सुंगे, तू (राऊत) कशाला मराठे कापायची सुपारी येतो? मी काय आहे हे राऊत दादाला माहितच नाही, मी काय चीज आहे. मी परिणामाची चिंता करत नाही. श्रीमंत लोकांना आरक्षणाची गरज नाही, त्यांना मराठ्यांची गरज नाही. त्यांना फक्त राजकारणासाठी मराठा पाहिजेत. त्याला दोष देऊन उपयोग नाही, ही सगळी भाषा फडणवीस यांची आहे. बघुयात ते म्हणत आहेत ना, तुकडे तुकडे काय आहे ते बघायचेच आहे. बार्शीत मराठ्यांचे घर आहे, तिथे घोंगडी बैठक होणार,असा इशारा त्यांनी राऊतांना दिला.

#### चॅलेंज स्वीकारले

जरांगे पाटील यांनी शनिवारी भाजपा समर्थक आ. राऊत यांना प्रत्युत्तर दिले. जरांगे पाटील म्हणाले, मी तुमचे चॅलेंज स्विकारले आहे, तुम्ही देवेंद्र फडणवीस, अजित पवार, एकनाथ शिंदे यांच्याकडून लिहून घ्यायचे. तुम्ही लिहून आणलेला कागद मी मराठ्यांना देतो. मग मराठे महाविकास आघाडीकडून लिहून आणतील. नाहीतर त्यांना पाडतील,असे प्रत्युत्तर देत जरांगे यांनी राऊतांचे आव्हान स्वीकारले.

#### बार्शीहून ३०० गाड्या सराटीत
##### आ.राऊतांवर रोष

बार्शी येथील मराठा बांधवांनी तब्बल ३०० गाड्यांचा ताफा घेऊन शनिवारी अंतरवाली सराटी जावून आ. राऊत यांच्या विषयी रोष व्यक्त केला. बार्शी येथे घोंगडी बैठक ठेवावी, अशी विनंती बार्शी मराठा बांधवांनी जरांगे यांच्याकडे केली. जरांगे यांनी आ. राऊत यांच्यावर धारदार टीका केली, तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही गंभीर आरोप केले. फडणवीस मराठ्यांना फसवण्याचं काम करत आहेत. त्यांनी मराठा समाजात दंगल घडवण्याचा प्रयत्न केला आहे.

## माळीनगर येथे दुचाकी पुलाला धडकल्याने चालक ठार

**अकलूज** : पुलावरून जात असताना दुचाकी कठड्यास धडकल्याने दुचाकी चालत गंभीर जखमी होऊन मरण पावला. हा अपघात माळीनगर येथील तुकाराम महाराज पालखी महामार्गावरील पुलावर गुरुवारी दुपारच्या सुमारास घडला.

सोमनाथ अभिमान गायकवाड (वय ५० रा. बाबरवस्ती मिरे) असे मयताचे नाव आह. ते गुरुवारी दुपारी १ वाजेच्या सुमारास माळीनगर येथील पुलावरून निघाले होते त्यावेळी पुलाच्या कठळयास दुचाकी धडकल्याने ते गंभीर जखमी होऊन मरण पावले. या अपघाताची नोंद अकलूज पोलिसात झाली.

## वादग्रस्त अधिकारी पूजा खेडकर सरकारी सेवेतून बरखास्त

### केंद्र सरकारचा महत्वाचा निर्णय

**नवी दिल्ली**

केंद्र सरकारने वादग्रस्त आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांना सरकारी सेवेतून बरखास्त करण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती आहे तसेच हा निर्णय तत्काळ प्रभावाने लागू होईल, असेही सरकारने म्हटले आहे. पुणे जिल्हाधिकारी कार्यालयील गैरवर्तन व त्यानंतर कागदपत्रांमध्ये आढळलेली अनियमितता या पार्श्वभूमीवर पूजा खेडकर यांच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे.

यूपीएससीकडून यापूर्वीच पूजा खेडकर यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. ३१ जुलै रोजी यूपीएससीने त्यांची उमेदवारी रद्द केली होती. तसेच त्यांना यापुढे यूपीएससीकडून घेण्यात येणाऱ्या कोणत्याही परीक्षेमध्ये बसता येणार नाही, असेही यूपीएससीकडून स्पष्ट करण्यात आले होते. याशिवाय पूजा खेडकर यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याचे निर्देशही यूपीएससीकडून देण्यात आले होते.पूजा खेडकर यांच्यावर दिल्ली पोलिसांनी दाखल केलेल्या गुन्ह्यानंतर त्यांनी दिल्लीच्या



पतियाला कोर्टात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता. पण हा अर्ज आज न्यायालयाने फेटाळला होता. यावेळी झालेल्या सुनावणीत ''जिल्हाधिकाऱ्यांवर लैंगिक शोषणाचे आरोप केले म्हणून आपल्याला लक्ष्य केले जात आहे'', असा दावा पूजा खेडकर यांच्यावतीने करण्यात आला होता. तर यूपीएससीने पूजा खेडकर यांनी फक्त आम्हालाच नाही, तर संपूर्ण समाजाला फसवले आहे, असे म्हणत त्यांच्या अटकेची मागणी केली होती. या संपूर्ण प्रकरणानंतर पूजा खेडकर यांनी दिल्ली उच्च न्यायालयात एम्स रुग्णालयात वैद्यकीय तपासणी करण्यास तयार असल्याचे म्हटले होते. त्यांचे अपंगत्व प्रमाणपत्र बनावट असल्याचा आरोप करण्यात आल्यानंतर त्यांनी ही तपासणी करण्याची तयारी दर्शवली होती.

#### नेमके आरोप काय?

पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात गैरवर्तन केल्याचा ठपका पूजा खेडकर यांच्यावर आधी ठेवण्यात आला होता. त्यानंतर हे प्रकरण चर्चेत आले होते. पुढे पूजा खेडकर यांनी सनदी सेवेत निवड होताना त्यांच्या दिव्यंगत्वाबाबत चुकीची कागदपत्रे सादर केल्याचाही आरोप करण्यात आला होता. शिवाय, त्यांच्या वडिलांची कोट्यवधींची मालमत्ता असूनही त्यांनी ओबीसी क्रिमी लेअर सुविधेचा लाभ घेतल्याचा आरोप करण्यात आला होता. तसेच, यासाठी त्यांनी परीक्षेसाठी अर्ज करताना नावामध्येही वारंवार बदल केल्याचा आरोप करण्यात आला होता.

## मणिपूरमध्ये पुन्हा हिंसाचार

**इंफाळ** : मणिपूरमध्ये पुन्हा एकदा हिंसाचाराला सुरुवात झाली आहे. जिरीबाममध्ये शस्त्रे हाती असलेल्या गटामध्ये गोळीबार झाला ज्यात ६ जणांचा मृत्यू झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ७ सप्टेंबर रोजी सकाळी झालेल्या हिंसाचारात ६ जण ठार झाले.

पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, एका झोपलेल्या व्यक्तीची गोळ्याघालून हत्या करण्यात आली. त्यानंतर दोन गटात गोळीबार झाला आणि ४ जणांचा मृत्यू झाला.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



बाप्पा, या खड्डेमय रस्त्यातील प्रवासामुळे खूप दमलोय !

कल्याण
126-93-238

# माकपच्या मेहनतीनेच काँग्रेसच्या झोळीत यश

### माजी आमदार नरसय्या आडम यांचा दावा : शहर मध्यमधून विधानसभा निवडणूक लढण्याची तयारी सुरु

**सोलापूर/विशेष प्रतिनिधी**

सोलापूरच्या कामगार चळवळीतील बुलंद आवाज म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जाते,ते माजी आमदार नरसय्या आडम यांनी शहर मध्यमधून निवडणूक लढवण्याची तयारी चालवली आहे. त्यांच्यासह माकपचे कार्यकर्ते रोज कॉर्नर बैठका घेत असून मेळाव्यांचे आयोजनही केले जात आहे.महाविकास आघाडीमधून शहर मध्यची जागा माकपला देण्यात आघाडीच्या नेत्यांमध्ये एकमत झाले आहे. लोकसभा निवडणुकित माकपच्या कार्यकर्त्यांनी रक्ताचे पाणी केल्यामुळेच काँग्रेसच्या पदरात यश पडले आहे,असा दावा आडम यांनी शनिवारी सुराज्यशी बोलताना केला

लोकसभेची निवडणूक झाल्या झाल्या आडम यांनी शहर मध्यवर हक्क सांगितला होता. पुण्यात गेल्या आठवड्यात काँग्रेसचा विभागिय मेळावा झाला.त्यात सोलापूर शहर मध्य मतदारसंघ आडम यांच्यासाठी सोडू नये, अशी मागणी पक्षश्रेष्ठींकडे करण्यात आली आहे, त्यानंतर काँग्रेसच्या शहराध्यक्षांनीही हा मतदारसंघ आडम सोडण्याचा प्रश्नच नाही, असे ठणकावून सांगितले होते. शहर मध्य मतदारसंघातून निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असणारे आडम यांच्या विधानसभा मोहिमेला खो बसण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.या पार्श्वभूमीवर आडम यांनी मनातल्या भावना सांगितल्या.

राज्यात आम्ही १२ जागा मागितल्या आहेत.त्यात चार जागांवर आघाडीमध्ये



एकमत झाले असून त्यात शहर मध्य आहे. आघाडीचे शिल्पकार शरद पवार यांनी आपल्याला विश्वास दिला आहे.शहर मध्यची जागा माकपला देण्यास भाग पाडू,माझ्यावर विश्वास ठेवा,असे पवारांनी मला सांगितले आहे.त्यामुळे कुणी काय म्हटले याला अर्थ नाही.शहर मध्यसाठी श्रीमती सोनिया गांधी यांच्यापर्यंत जाण्याची आपली तयारी आहे पण आघाडीचे नेते तशी वेळ माझ्यावर येवू देतील,असे मला वाटत नाही,असे आडम एका प्रश्नाला उत्तर देताना म्हणाले.

लोकसभा निवडणुकित माजी आमदार नरसय्या आडम यांनी इंडिया आघाडीतील घटक पक्ष या नात्याने प्रणिती शिंदे यांच्यासाठी काम केले होते. त्याचवेळी त्यांनी विधानसभा निवडणुकित सोलापूर शहर मध्य मतदार संघ मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला मिळावा, अशी आग्रहाची मागणी केली होती. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सचिव सीताराम येच्युरी यांची सुशीलकुमार शिंदे आणि सोनिया गांधी यांच्याशी चर्चा झाल्याचेही आडम यांनी सांगितले होते. मात्र, त्यावर सुशीलकुमार शिंदे यांनी कुठलेही भाष्य केले नव्हते.माकपच्या कार्यकर्त्यांनी रात्रीचा दिवस केल्यानेच काँग्रेसला यश मिळाले आहे,अन्यथा परिणाम गंभीर झाले असते,असेही आडम म्हणाले.

लोकसभा निवडणुकीनंतर आडम मास्तर यांनी महाविकास आघाडीचे प्रमुख नेते शरद पवार यांची भेट घेतली होती. त्या भेटी त्यांनी 'सोलापूर शहर मध्य'सह १२ मतदारसंघ मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला सोडावेत, अशी मागणी केली होती. पवारांनंतर आडम यांनी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि विधिमंडळ नेते बाळासाहेब थोरात यांचीही संगमनेर येथे जाऊन भेट घेतली होती. त्यावेळी त्यांनी सोलापूर शहर मध्य मतदारसंघाची मागणी केली होती.